PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Kashasathi Premasathi
Year: 1987

Song: Kashi Tula Samjaau
Lyricist: Sudhir Moghe

कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू रे...
कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू
तू रुसल्यावर तुझियावाचून
तू रुसल्यावर तुझियावाचून
सांग कशी मी राहू
कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू रे...
कशी तुला समजावू

तुला वाहिले सारें जीवन
माझें तनमन माझें मीपण
तुला वाहीले सारें जीवन
माझे तनमन माझे मीपण
सर्वस्वाचे दान दिल्यावर
सर्वस्वाचे दान दिल्यावर
काय आणखी देऊ
कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू रे...
कशी तुला समजावू

थोडे भांडण थोडा रुसवा
त्यातही असतो एक गोडवा
थोडे भांडण थोडा रुसवा
त्यातही असतो एक गोडवा
पण थोडयांतच सारी गोडी
पण थोडयांतच सारी गोडी
नकोस विसरुन जाऊ
कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू रे...
कशी तुला समजावू

प्रीती म्हणजे अमोल मोती
मागून का कधी येतो हाती
प्रीती म्हणजे अमोल मोती
मागून का कधी येतो हाती
दोन मनांचा करुन शिंपला
दोन मनांचा करुन शिंपला
तो संभाळून ठेवू
कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू
तू रुसल्यावर तुझियावाचून
सांग कशी मी राहू
कशी तुला समजावू
प्रिया मी कशी तुला समजावू रे...
कशी तुला समजावू

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*